MHND200003322020

## निशाणी क्र.३७० लगत आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अभियोगपक्षातर्फे सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. वसंत चव्हाण यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३११ प्रमाणे मुद्रांक जिल्हाधिकारी, नांदेड यांना साक्षीसमन्स काढण्याची विनंती केली आहे.

२. या अर्जावर आरोपींतर्फे निशाणी ३७३ ते ३७५ वर लेखी कथन सादर करण्यात आले.

३. अर्जाचे, आरोपींच्या कथनाचे आणि संचिकेचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

४. सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. वसंत चव्हाण यांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुतच्या खटल्यात आरोपी क्र.२६ रविंद्र चव्हाण रा. उमरी ता. उमरी जि. नांदेड हा मुद्रांक विक्रेता होता. त्याच्याकडून आरोपींनी दिनांक २६/०६/२०१७ रोजी मुद्रांक क्र.१५०९, १५११ ते १५३३ व १५७० असे मुद्रांक रु.१००/– चे प्रत्येकी खरेदी केले. त्या मुद्रांकावर दिनांक ०८/०६/२०१७ अशी बनावट तारीख टाकण्यात आली. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, त्या मुद्रांकाचा वापर शासनाची व इतरांची फसवणुक करण्यासाठी करण्यात आला आहे. त्यानुषंगाने आरोपीं विरुध्द दोषारोप निश्चित झालेले आहेत. मुद्रांक अधिकारी यांनी आरोपी क्र.२६ याला त्या क्रमांकाचे मुद्रांक कोणत्या तारखेला दिले होते? यासाठी मुद्रांक अधिका–याची साक्ष नोंदविणे आवश्यक आहे. सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. वसंत चव्हाण यांनी युक्तीवाद केला की, 'केवळ खटला अंतिम युक्तीवादाकरीता आहे' या कारणास्तव फौजदारी प्रक्रिया

संहिता कलम ३११ मधील अधिकार वापरता येणार नाहीत, असे म्हणणे चुकीचे आहे. सदर साक्षीदाराची साक्ष खटल्याचा निकाल न्यायपणे होण्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

५. आरोपी क्र.१ ते ९, ११ ते २५, २७, २८ आणि ३० ते ३८ यांचे सुविद्य विधिज्ञ श्री. चेतन राठोड व आरोपी क्र.१० व २९ यांचे सुविद्य विधिज्ञ श्री. अविनाश ढगे आणि आरोपी क्र.२६ चे सुविद्य विधिज्ञ श्री. सुभाष कांबळे यांचा युक्तीवाद ऐकला. या तिन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद एकाच मुद्दयावर आहे. त्यांच्या युक्तीवादाप्रमाणे खटल्यात अभियोगपक्षातर्फे नऊ साक्षीदार तपासण्यात आले असून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. खटला अंतिम युक्तीवादासाठी आहे. अभियोगपक्षाने केवळ पुराव्यातील पोकळी भरुन काढण्यासाठी सदर अर्ज सादर केला आहे. त्यामुळे तो अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

६. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३११ प्रमाणे न्यायालय संपरिक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही व्यक्तीला खटल्याचा निर्णय न्यायपणे होण्यासाठी साक्षीसमन्स काढू शकते. कायद्याच्या या तत्वाच्या पार्श्वभूमिवर संचिकेचे अवलोकन केले असता, प्रस्तुतच्या खटल्यामध्ये दोषारोपपत्रातील नमुद केलेले सर्व साक्षीदार तपासण्यात आले आहेत. त्या साक्षीदारांच्या साक्षीत आरोपींविरुध्द आरोपीत पुरावा न आल्याने मी अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला होता. या खटल्यातील प्रथम खबरी व तपास अधिकारी मयत असल्याने त्यांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४६५, ४६८, ४७१ अंतर्गत दोषारोप निश्चित करण्यात आले आहेत. त्यामध्ये आरोपी क्र.२६ याच्यासोबत इतर आरोपींनी संगनमत करुन दिनांक २८/०६/२०१७ रोजी रु.१००/– च्या मुद्रांकावर दिनांक ०८/०६/२०१७ अशी तारीख टाकून बनावट दस्तऐवज तयार केला व तो फसवणुकीसाठी वापरला असा दोषारोप आहे. तपास अधिकारी यांनी प्रस्ततुच्या अर्जात नमुद असलेल्या मुद्रांकांच्या मुळ प्रती दाखल केलेल्या आहेत परंतु ते मुद्रांक आरोपी क्र.२६ याला मुद्रांक कार्यालयाकडून कधी प्राप्त झाले होते? या अनुषंगाने मुद्रांक अधिका–याचा जबाब घेतलेला नाही. तपास अधिकारी मयत असल्याने

त्याबाबत त्याचे स्पष्टीकरण खटल्यात मागविता येणार नाही. आरोपीं विरुध्द निश्चित करण्यात आलेले दोषारोप विचारात घेतले असता, मुद्रांक अधिकारी याची साक्ष खटल्याचा निर्णय न्यायपणे होण्यासाठी आवश्यक आहे. केवळ खटला अंतिम युक्तीवादासाठी आहे, या कारणास्तव अर्ज नामंजूर करणे न्यायसंगत नाही. सदर न्यायालय हे संपरिक्षा करणारे न्यायालय आहे. या न्यायालयात उभय पक्षकारांना त्यांच्याकडे असलेला उत्तम पुरावा सादर करण्याची संधी आहे. जर प्रस्तुतचा अर्ज मंजूर केला आणि मुद्रांक अधिकारी याला साक्षीसमन्स काढले तर आरोपींनासुध्दा त्याचा उलटतपास घेण्याची पूर्णतः संधी आहे. त्यामुळे आरोपीं विरुध्द अन्याय होणार नाही. उलट जर प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केला तर अभियोगपक्ष दोषारोप सिध्द करण्यासाठी महत्वपूर्ण पुरावा न्यायालयासमक्ष आणू शकणार नाही. खटल्याची संपरिक्षा न्यायपणे होण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३११ मधील अधिकार वापरणे आवश्यक आहेत. सबब, मी अभियोगपक्षाचा अर्ज मंजूर करीत आहे.

## आदेश

१. निशाणी ३७० वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मुद्रांक जिल्हाधिकारी, नांदेड यांनी आरोपीं क्र.२६ रविंद्र चव्हाण (मुद्रांक विक्रेता) रा. उमरी ता. उमरी जि. नांदेड याला मुद्रांक क्र.१५०९, १५११ ते १५३३ व १५७० (RP No.127678 to 127702 year 2016) हे कोणत्या तारखेला त्यांच्या कार्यालयामधून दिले तसेच आरोपी क्र.२६ रविंद्र चव्हाण याने ते मुद्रांक कधी व कोणाला विक्री केले? या अनुषंगाने त्यांच्या कार्यालयात असलेले नोंदी अथवा रजिस्टरच्या मुळ प्रती साक्षीकामी येताना घेवून यावे.

३. साक्षीदाराला साक्षीसमन्स काढण्यात यावे.

PATKI RAJESH RAMESHRAO

Digitally signed by PATKI RAJESH RAMESHRAO
Date: 2024.12.02 15:41:02 +0530

(रा. र. पत्की)

ठिकाण : माहूर
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माहूर

दिनांक : ०२/१२/२०२४.
जि. नांदेड

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द नि शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | श्री. प्र. मा. ढवळे |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माहूर |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | : | ०२/१२/२०२४ |
| न्यायनिर्णयावर पिठासिन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | : | ०२/१२/२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | : | ०२/१२/२०२४ |